ePaper
खळबळजनक! छत्तीसगडमध्ये भर बैठकीत भाजपा नेत्याची निर्घृण हत्या!

| वर्ष - 7 । अंक - 178 | UDYAM-MH-26-0158827 |




# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- पाकिस्तान सेमी फायनलला जाणार?
- आमिर खानच्या लेकीचं केळवण
- भाजप पक्षाची ईडीसोबत युती!
- लोकसभेला ४५ जागा जिंकणार!


www.mahaenews.com । रविवार, दिनांक 5 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# उबाठा शिवसेनेचे 'टार्गेट पीसी'!

## राज्यातील नेत्यांचे शहरात दौरे वाढले : पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साह भरण्याचे काम

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तीन विधानसभेच्या जागा, महापालिकेतील 128 नगरसेवकांची संख्या, दोन लोकसभा मतदारसंघामध्ये असलेला शहराचा समावेश पाहता, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेकडून पिंपरी-चिंचवड विशेष टार्गेट करून काम केले जात आहे. राज्यातील शिवसेनेच्या महत्त्वाच्या नेत्यांचे दौरे, बैठका, मेळावे, प्रशासकीय कामकाजांचा आढावा यावर पक्षाने विशेष लक्ष दिले आहे. शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर पक्ष सावरण्यासाठी शिवसेना सरसावल्याचे हे चित्र आहे. त्याला कितपत यश मिळेल, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होणार आहे.**




### पदांवर त्वरीत नियुक्त्या हव्या

पक्ष फुटीनंतर मावळ जिल्हाप्रमुखपदी माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार यांची नियुक्ती करून कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम पक्षाने केले आहे. मात्र उर्वरीत इतर नियुक्त्या संथ गतीने होताना दिसत आहेत. विविध पदांसाठी राज्यातील नेत्यांच्या उपस्थितीत मुलाखती देखील झाल्या आहेत. मात्र अद्याप नवीन नियुक्त्या केल्या नाहीत. त्यामुळे पक्षात काहीसे नैराश्य असल्याचे चित्र आहे.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मानणारा विशेष वर्ग पिंपरी-चिंचवड शहरात कार्यरत आहे. पक्षाला मावळ आणि शिरूर लोकसभेत दोन खासदार आणि पिंपरी विधानसभेत एक आमदार देण्याचे काम शहरवासियांनी यापुर्वी केले आहे. तर भोसरी विधानसभेला वारंवार उमेदवाराचा निसटता पराभव झाल्याचे पहावयास मिळाले आहे. अर्थात ही स्थिती शिवसेनेच्या फुटीपुर्वीची आहे. कालांतराने पक्षात दुफळी निर्माण झाली. शहरातही त्याचा परिणाम दिसू लागला. खा. श्रीरंग बारणे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात प्रवेश केला. त्यानंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटाला आपली ताकद दाखविण्याचे आव्हान उभा राहिले.

मात्र शिवसैनिकांमधील चैतन्य हरवू न देता त्यांना पुन्हा लढायला उभा करण्यासाठी ठाकरे यांच्या शिवसेनेने मशाल हाती घेतली आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी राज्यातील वरिष्ठ नेत्यांच्या दौऱ्यात वाढ केली आहे. गेल्या महिन्यात राज्याच्या विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा दोन वेळा दौरा झाला आहे. एक वेळ खासगी भेटी घेतल्याचे वृत्त आहे. तर एक वेळ पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात त्यांनी भेट देऊन रुग्णसेवेचा आढावा घेतला. शिवसेना स्टाईलने सूचना दिल्या.

दानवे यांच्या सोबतच आमदार सचिन अहिर यांनी शहरावर विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. त्यांनी शहरातील प्रत्येक पदाधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष संपर्क ठेवून पक्षवाढीसाठी कंबर कसली आहे.

अहिर यांनी सातत्याने शहरात दौरे करून पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्याचे काम केले आहे. या पुर्वी पक्षाने नेमलेल्या निरिक्षकांच्या माध्यमातून चिंचवड विधानसभेत कोपरा सभा घेत पक्षाच्या कामाचा आढावा घेतला होता.

शहरात एकंदरीतच उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटाने आपली ताकद दाखविण्यासाठी प्रयत्न सुरू केले असले तरी त्याला किती यश येईल, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होणार आहे.

# पुनावळेत आज नागरिकांचे "चिपको आंदोलन"!

## प्रस्तावित कचरा डेपोला विरोध: बाईक रॅलीचेही आयोजन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून प्रस्तावित असलेल्या पुनावळे कचरा डेपोसाठी वनविभागाच्या जागेतील वृक्षतोडी विरोधात झाडांना आलिंगन देऊन चिपको आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच कचरा डेपोला विरोध करण्यासाठी उद्या रविवारी (दि. 5) सकाळी 10 ते दुपारी 12 या वेळेत पुनावळे परिसरात नागरिकांकडून दुचाकी रॅली काढण्यात येणार आहे.**




### सहा गावाचे नागरिक होणार सहभागी...

या आंदोलनात पुनावळे, ताथवडे, मारुंजी, जांबे, हिंजवडी, लाइफ रिपब्लिक टाऊनशिप, वाकड या परिसरातील नागरिक सहभागी होणार आहेत.

पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्था फेडरेशन आणि पुनावळे रेसिडेंट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पुनावळे येथे वनविभागाची 26 हेक्टर जागा आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने मागणी केल्यामुळे ही जागा महापालिकेकडे हस्तांतरित केली आहे. पुनावळे परिसरात नागरीकरण वाढले आहे.

मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प, शैक्षणिक संस्था, रुग्णालये उभारली आहेत. पुनावळेतील प्रस्तावित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पापासुन विविध इमारती, गृहनिर्माण सोसायटी खूप कमी अंतरावर आहे. त्यामुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

उद्या रविवारी (दि. 5) पुनावळे येथील लेटीट्यूड मॉलपासून दुचाकी रॅलीला सुरुवात होणार आहे. रॅली झाल्यानंतर पुनावळे काटे वस्ती येथील वन विभागाच्या जागेतील झाडांना आलिंगन देऊन चिपको आंदोलन करण्यात येणार आहे.

# उपक्रम, अभियान विनापरवानगी राबवल्यास होणार कायदेशीर कारवाई!

## » तीन दिवसांतील घटनांच्या पार्श्वभूमीवर निर्णय

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेली हाणामारी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर लिहिल्याची तक्रार, राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून विद्यार्थ्यांना मारहाण अशा घटनांमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात तणावाचे वातावरण आहे.**



मात्र, आता घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी विद्यापीठाने प्रशासनाने शैक्षणिक संकुलात सभासद नोंदणी, विविध अभियान, कार्यक्रम, उपक्रम, आंदोलनांना मज्जाव केला आहे. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय कार्यक्रम आयोजित करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. विद्यापीठात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असणाऱ्या अशैक्षणिक घटनांमुळे विद्यापीठाच्या संकुलाची तुलना दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाशी (जेएनयू) करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांच्या घटनांचा फटका विद्यापीठाच्या प्रतिमेला बसत आहे. त्यामुळे विद्यापीठातील प्रशासकीय यंत्रणा आणि सुरक्षा व्यवस्था दक्ष झाली आहे. विद्यापीठामध्ये येणाऱ्या प्रत्येकाची चौकशी, नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. वसतिगृहात केवळ रहिवाशी विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे.

विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलात सभासद नोंदणी, विविध अभियान, कार्यक्रम, उपक्रम, आंदोलन आदी उपक्रम घेण्यासाठी विद्यापीठ प्रशासन आणि पोलिसांची परवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. परवानगी न घेणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात लिहिलेल्या आक्षेपार्ह लिखाणाचा मी निषेध करतो. पण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना मारहाण करणारयांवर कोणत्याही पक्षाचा किंवा संघटनेचा पदाधिकारी असो त्याच्यावर तीन दिवसात कारवाई झाली पाहिजे. जर तीन दिवसात कारवाई झाली नाही तर, विद्यापीठ बंद करण अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मांडली. तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने असलेल्या हॉलची तोडफोड एप्रिल महिन्यात झाली होती. त्या तोडफोड करणाऱ्या विद्यार्थ्यांवर देखील अद्याप कारवाई झाली नाही. त्यामुळे आमच्या सर्व मागण्यांची दखल विद्यापीठ प्रशासनाने घ्यावी अन्यथा तीव्र लढा उभारू असा इशारा त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाला त्यांनी दिला. या सर्व घडामोडी दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ठिकाणी येऊन ज्या डाव्या संघटनेतील पदाधिकाऱ्यांना काल मारहाण झाल्याची घटना घडली. त्या सर्वांची रोहित पवार यांनी विचारपूस करण्यासाठी आले होते. त्यावेळी रोहित पवार यांनी मारहाण झालेल्या विद्यार्थ्यांना धीर देत विचारपूस केली.

### आक्षेपार्ह लिखाणाचा निषेध

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वसतिगृहात आक्षेपार्ह मजकूर लिहिल्याची घटना दोन दिवसापूर्वी समोर आली.त्यानंतर राजकीय वर्तुळात आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळाले. त्या घटनेच्या निषेधार्थ भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या नेतृत्वाखाली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये काल आंदोलन करण्यात आले. त्यावेळी डाव्या संघटनेचे प्रतिनिधी आंदोलन ठिकाणी येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. त्यावेळी भाजपचे कार्यकर्ते आणि घोषणा देणाऱ्यामध्ये वादाचा प्रकार घडला. त्यामुळे काही विद्यापीठ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर भाजपचे पदाधिकारी आणि डाव्या संघटनेचे प्रतिनिधी यांच्यात पुन्हा एकदा आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळाले.

# दिवाळीच्या खरेदीमुळे शहरातील वाहतूक विस्कळीत

## » पुणे मध्य भागासह उपनगरातील बाजारपेठेत गर्दी

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**दिवाळीच्या खरेदीसाठी शनिवारी लक्ष्मी रस्ता, मंडई परिसरात झुंबड उडाली. गर्दीमुळे बाजीराव रस्ता, शनिपार, मंडई, तसेच शिवाजी रस्ता परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली होती. खरेदीसाठी अनेकजण मोटारीतून आले होते. खरेदीसाठी गर्दी झाल्याने मध्य भागातील गल्ली-बोळातील वाहतूक विस्कळीत झाली होती.**

दिवाळीचा प्रारंभ गुरुवारी (रमा एकादशी आणि वसुबारस – ९ नोव्हेंबर) होत आहे. रविवारी (१२ नोव्हेंबर) नरक चतुर्दशी आणि लक्ष्मीपूजन आहे. नरक चतुर्दशीला नवीन कपडे परिधान करण्याची प्रथा असल्याने लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, टिळक रस्ता, फडके हौद परिसरातील वस्त्र दालनात सकाळपासून खरेदीसाठी गर्दी झाली होती. मध्य भागातील सर्वच रस्त्यांवर खरेदीसाठी गर्दी झाली होती. बोहरी आळीतील रस्ते अरुंद असल्याने या भागातून चालणे देखील अवघड झाले होते.



मंडई, शनिपार परिसरात उटणे, आकाशकंदील, पूजा साहित्य खरेदीसाठी गर्दी झाली होती. बुधवार पेठेतील पासोड्या मंदिराजवळील विद्युत साहित्य विक्री करणारी दुकाने रोषणाईने उजळली होती. अनेकजण सहकुटुंब मध्य भागात खरेदीसाठी आले होते. बाजीराव रस्ता, मंडई, शनिपार, शिवाजी रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. अनेकजण सहकुटुंब मोटारीतून खरेदीसाठी आले होते. मंडई, नारायण पेठेतील वाहनतळावर मोटारी लावण्यास जागा उपलब्ध नसल्याने अनेकांनी नदीपात्रातील रस्त्यावर मोटारी लावल्या. नदीपात्रातील रस्त्यावर कोंडी झाली होती. नदीपात्रातील रस्त्यावर कोंडी झाल्याने केळकर रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली. मध्य भागासह कोथरुड, वारजे, धनकवडी, कात्रज, सिंहगड रस्ता, वानवडी, हडपसर, विश्रांतवाडी, येरवडा, चंदननगर येथील बाजारपेठेत शनिवारी गर्दी झाली होती. उपनगरातील बाजारपेठेतील वाहतूक विस्कळीत झाली होती.

### मोटारींमुळे कोंडीत भर

» अनेकजण सहकुटुंब मोटारीतून खरेदीसाठी आले होते. मंडई, नारायण पेठेतील वाहनतळावर मोटारी लावण्यास जागा उपलब्ध नसल्याने अनेकांनी नदीपात्रातील रस्त्यावर मोटारी लावल्या. नदीपात्रातील रस्त्यावर कोंडी झाली होती. नदीपात्रातील रस्त्यावर कोंडी झाल्याने केळकर रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली.

# पोलीस आयुक्तालयासाठी मोशीतील जागेचा पर्याय!

» पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांची पाहणी

» भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, मुख्यालय आणि पोलीस परेड ग्राउंडसाठी मोशी येथील गायरान जमीन उपलब्ध करण्यासाठी महापालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय आणि राज्य सरकारकडे भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा करीत आहेत.**



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी आज प्रस्तावित जागेची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस सहआयुक्त संजय शिंदे, पोलीस उपायुक्त संदिप डोईफोडे, नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड, तहसीलदार अर्चना निकम, पोलीस उपायुक्त शिवाजी पवार आदी अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय निर्मिती २०१८ मध्ये करण्यात आली. यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली होती. तसेच, २०१४ पासून आमदार महेश लांडगे यांनी आयुक्तालयासाठी शासनदरबारी पाठपुरावा केला आहे. त्याला यश मिळाले. आयुक्तालयाचे कामकाज २०१८ मध्ये सुरू झाले. मात्र, गेल्या पाच वर्षांपासून अद्याप आयुक्तालयासाठी हक्काची जागा मिळलेली नाही.

दरम्यान, देहूगाव गायरान येथील ६५ एकर जागा पिंपरी-चिंचवड आयुक्तालयासाठी देण्याबाबत राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. मात्र, या जागेला स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांचा विरोध आहे. त्यासाठी ग्रामस्थांनी आंदोलनात्मक भूमिका घेतलेली आहे.

त्यामुळे सदर जागा उपलब्ध होण्यास विलंब आणि अडचणी निर्माण होणार आहेत. त्यामुळे मोशी येथील गायरान जागेत पोलीस आयुक्तालय उभारावे, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे.



“ पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. शहरातील काही पोलीस ठाण्यांचे विभाजनही करण्यात येणार आहे. पोलीस परेड ग्राउंड आणि अन्य कामकाज एकाच आणि मध्यवर्ती ठिकाणी झाल्यास पोलीस आयुक्तालयाच्या प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता येईल. मध्यवर्ती ठिकाण म्हणून मोशीतील गायरान जमिनीवर पोलीस आयुक्तालयाची भव्य इमारत उभारावी, यासाठी आम्ही आग्रही आहोत. पोलीस आयुक्तांनी आज जागेची पाहणी केली. यासाठी आता महापालिका, जिल्हाधिकारी कार्यालय आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार आहोत.

**- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

---

# 'पावनामाई'ची दुर्दशा अधिकाऱ्यांमुळेच!

## » खासदार बारणे यांचा संताप : 'महाईन्यूज'च्या वृत्ताची दखल

### » महापालिका प्रशासनाविरोधात जनहित याचिका दाखल करणार!

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मागील काही दिवसात चारवेळा पवना नदी फेसाळली आहे. नदीपात्रात थेट ड्रेनेज, रसायनमिश्रित पाणी सोडले जाते. रावेत येथील अशुद्ध बंधा-यापर्यंत दुषित पाणी गेले आहे. शहरवासीयांना दूषित पाणीपुरवठा केला जात आहे. पवनामाईच्या दुर्दशेला महापालिकेच्या पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी हे जबाबदार आहेत. शासनाने त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी, अन्यथा न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिला आहे.**



याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पत्र लिहून संजय कुलकर्णी यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची (एमपीसीबी) पत्र दिले आहे. पावना नदी प्रदूषणबाबत 'महाईन्यूज'ने "शापित पावना : बेजबादार प्रशासन; माशगुल राजकारणी अन् रामभरोसे पिंपरी-चिंचवडकर" अशा मथळ्याने रोखठोक वृत्त प्रसिद्ध केले होते. त्याची दखल खासदार श्रीरंग बारणे यांनी घेतली. महापालिका प्रशासनाविरोधात कारवाईचा इशारा दिला आहे.

खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, शहरातून वाहणाऱ्या पवना नदीचे पात्र 24 किलो मीटर आहे. किवळेपासून दापोडीपर्यंत पवना नदीचे प्रदूषण वाढले आहे. नदीलगतच्या भागात किवळे, पुनावळे, रावेत, ताथवडे, वाल्हेकरवाडी, थेरगाव, चिंचवडगाव, काळेवाडी, पिंपरी, दापोडी, पिंपळेगुरव, सांगवी, कासारवाडी व दापोडीपर्यंत पाण्याचे प्रदूषण वाढल्याचे दिसून येते. पवना नदी सातत्याने फेसाळत आहे. नदीतील पाण्यावर फेस तरंगतो. नदी प्रदूषित झाली आहे. यंदाच्या पावसाळ्यात चारवेळा नदी फेसाळली. दोनदिवसांपूर्वी थेरगावातील केजुदेवी बंधारा ते चिंचवडगावातील श्री मोरया गोसावी घाट या दरम्यान पवना नदी मोठ्या प्रमाणात फेसाळली. मासे मृत पावले. सांडपाणी, रसायनमिश्रित पाणी नदीपात्रात सोडल्याने सातत्याने नदी फेसाळत आहे. पवनामाईची दुरावस्था झाली आहे. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पत्र लिहून संजय कुलकर्णी यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची (एमपीसीबी) पत्र दिले आहे. खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, शहरातून वाहणाऱ्या पवना नदीचे पात्र 24 किलो मीटर आहे. किवळेपासून दापोडीपर्यंत पवना नदीचे प्रदूषण वाढले आहे. नदीलगतच्या भागात किवळे, पुनावळे, रावेत, ताथवडे, वाल्हेकरवाडी, थेरगाव, चिंचवडगाव, काळेवाडी, पिंपरी, दापोडी, पिंपळेगुरव, सांगवी, कासारवाडी व दापोडीपर्यंत पाण्याचे प्रदूषण वाढल्याचे दिसून येते. पवना नदी सातत्याने फेसाळत आहे. नदीतील पाण्यावर फेस तरंगतो. नदी प्रदूषित झाली आहे. यंदाच्या पावसाळ्यात चारवेळा नदी फेसाळली. दोनदिवसांपूर्वी थेरगावातील केजुदेवी बंधारा ते चिंचवडगावातील श्री मोरया गोसावी घाट या दरम्यान पवना नदी मोठ्या प्रमाणात फेसाळली. मासे मृत पावले. सांडपाणी, रसायनमिश्रित पाणी नदीपात्रात सोडल्याने सातत्याने नदी फेसाळत आहे. पवनामाईची दुरावस्था झाली आहे.

### संजय कुलकर्णी आणि एसटीपी मालकांचे आर्थिक लागेबांधे...

**» पवना नदीच्या दुर्देशेला पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी हे पूर्णपणे जबाबदार आहेत. सांडपाणी, रसायनमिश्रित पाणी थेट नदीपात्रात सोडले जाते. तरीही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) मालक आणि कुलकर्णी यांचे आर्थिक लागेबांधे आहेत. त्यामुळे शासनाने तत्काळ कुलकर्णी यांच्यावर कारवाई करावी. यासाठी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठविले आहे. शासनाने कारवाई न केल्यास पवना नदीच्या प्रदूषणाला कारणीभूत असलेल्या कुलकर्णी यांच्याविरोधात याचिका दाखल करणार असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.**




**कृत्रिम बुद्धिमत्ता भविष्यात मानवी बुद्धिमत्तेची जागा घेईल का, हा प्रश्न विश्वामध्ये दुसरी जीवसृष्टी इतर कोठे असेल का, या प्रश्नाइतकाच उत्कट गूढ ठरत आला आहे. या दोन्ही प्रश्नांच्या चर्चेतील एक समान दुवा असा, की भयगर्भित उत्कटतेतच रममाण होत राहिल्यामुळे, उत्तरे शोधता शोधता प्रश्नच अधिक निर्माण होतात!**

# बुद्धिमत्तेचा कृत्रिम 'भस्मासुर'!




या भानगडीत मूळ प्रश्नांची रोकडी उत्तरेही मिळत नाहीत. मुद्दा अनुत्तरितच राहतो. वैद्यक क्रांती, औद्योगिक क्रांती, संगणन व आंतरजाल या टप्प्यांप्रमाणे कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात 'एआय' हा आधुनिक मानवाच्या उत्क्रांतीमधील महत्त्वाचा टप्पा. उत्क्रांतीचा विषय निघतो तेव्हा केवळ जैविक उत्क्रांतीवरच भर देण्याची प्रथा आहे. परंतु प्राथमिक हत्यारे वापरत वानराचा नर झाला तोपर्यंतचा टप्पा आणि त्यानंतर भाषा, कृषी, संस्कृती, धर्म, देश, गणतंत्र, विज्ञान, वैद्यक, तंत्रज्ञान, अणुज्ञान, सृष्टिभान, उद्योगभान, संगणन, संपर्कज्ञान या टप्प्यांमध्ये झालेला आणि अजूनही सुरू असलेला मानवी प्रवास हे दोन स्वतंत्रपणे अभ्यासण्याचे टप्पे ठरतात. कारण इतर कोणत्याही जिवाच्या शक्तीने आजवर जितका परिणाम चराचरावर केला नाही, तितका तो मानवी बुद्धीने वा प्रज्ञेने घडवून आणला आहे. तशात आता मानवी प्रज्ञेला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाल्यामुळे यातून जे रसायन उद्भवते ते मानवी प्रज्ञेला आणि परिणामी मानवाला भारी पडू शकते, अशी भावना जगभर मूळ धरू लागली आहे. याच धास्तीतून 'एआय'च्या नियमनाची गरज निर्माण झाली. या निकडीतूनच ब्रिटनमधील ब्लेचली पार्क येथे नुकतीच जगातली पहिलीवहिली 'एआय सेफ्टी समिट' म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता सुरक्षितता शिखर परिषद पार पडली. या परिषदेच्या अखेरीस ब्लेचली जाहीरनामाही प्रसृत करण्यात आला. भविष्यात हा जाहीरनामा 'एआय'च्या व्यापक नियमनाला आकार देईल हे नक्की. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात नाझी जर्मनीच्या सांकेतिक संदेशांची उकल करण्यासाठी ब्रिटिश गणितज्ञ ॲलन ट्युरिंग यांच्या नेतृत्वाखाली एक पथक या ठिकाणीच कार्यरत होते. तो खऱ्या अर्थाने तंत्रज्ञानाचा शस्त्रज्ञानावर मिळवलेला पहिला विजय ठरतो. याच संशोधनातून पुढे जगातील पहिलावहिला संगणक उदयास आला. त्या यंत्रामध्ये संगणनाची प्राथमिक क्षमता होती. म्हणजे मानवाव्यतिरिक्त असे काही तरी निर्मिले जात होते, जे गणती करू शकत होते. पण त्याही पुढे जाऊन हे यंत्र 'विचार' करू शकेल का, असा प्रश्न ट्युरिंगने उपस्थित केला होता. त्यासाठी १२ हजार शब्दांचे प्रदीर्घ टिपण त्याने लिहिले. त्याच्या अखेरीस जे लिहिले ते महत्त्वाचे – 'आपण फार लांबचे पाहू नाही शकत. पण करण्यासारखे खूप काही आहे जे दिसू शकते'! आज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीत साधारण अशीच परिस्थिती आहे. दररोज एखाद्या नवीन क्षेत्रात 'एआय'चा शिरकाव होत असलेला आपण पाहतो. एखाद्या संगणक प्रणालीत किंवा समूह संगणक प्रणालीत विदा (डेटा) भरून, रचनावली (अल्गोरिदम) सादर करून पुढील निष्कर्षांच्या वाटेवर सोडून देऊन आपले उद्दिष्ट साध्य करण्याची पद्धत आजकाल सरसकट रूढ झाली आहे. सर्जनशील क्रियाकलाप, शल्यचिकित्सा वा रोगनिदान, हवामान भाकीत, अंतराळ संशोधन, धान्यपीक निश्चिती, उच्च शिक्षण, खेळांमधील व्यूहरचना, साथरोग नियंत्रण अशा विधायक क्षेत्रांमध्ये 'एआय'चा वापर वरचेवर होऊ लागला आहे. परंतु कृत्रिम बुद्धिमत्ता वापरण्याची क्षेत्रे तेवढ्यापुरती मर्यादित राहू शकत नाहीत. हा वापर विध्वंसक हेतूंसाठीही होऊ शकतो. जगभरातील बँकिंग यंत्रणा आणि भांडवली बाजार, उपग्रह संचार यंत्रणा, दूरसंचार यंत्रणा यांना लक्ष्य केले जाऊ शकते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिरकाव निवडणूक प्रक्रियेमध्ये केला जाऊ शकतो. या तंत्राचा वापर करून जैविक वा रासायनिक अस्त्रे किंवा अधिक धोकादायक अण्वस्त्रे डागली जाऊ शकतात, अशीही भीती व्यक्त केली जाते. ही झाली एक बाजू. दुसरीकडे 'एआय'च्या वापरामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारांवर गदा येणार असल्याची प्रचीती प्रगत देशांतही येऊ लागली आहे. कदाचित त्या देशांमध्ये याविरुद्ध उमटणारी प्रतिक्रिया एका मर्यादेपेक्षा अधिक नसेल.

## संपादकीय »

# अधिक वेडे कोण?

*तीन वर्षांपूर्वी २०२० साली अमेरिकेच्या सीमेवर पकडले गेलेल्यांची संख्या होती १९,८८३ इतकी. आता ती लाखाच्या घरात आहे.*

आपल्याकडच्या एका नेत्याशी मागे एकदा गप्पा मारताना चर्चेचा विषय होता भय्ये. हे उत्तर प्रदेशी, बिहारी 'बेकार आणि बेरोजगार' तरुण मुंबईत कसे येतात आणि आपल्या तरुणांच्या तोंडचा घास कसा हिरावून घेतात.. आपल्या पोरांच्या रोजगारावर कशी गदा येते वगैरे नेहमीचे मुद्दे. त्यांचा सूर असा होता की मराठी तरुण जणू काही वाटच पाहात बसलेत मिळेल ते काम करण्यासाठी. त्यांना म्हटलं कोकणात हल्ली आंबे/ नारळ पाडायला बिहारी/ नेपाळी पोरं असतात. तर ते त्यांनी न ऐकल्यासारखं केलं. मग या अशा भावनोद्दीपित मुद्द्यांवर त्यांचा सात्त्विक संताप शांत होऊ दिला. पत्रकारितेतल्या अनुभवावरनं एव्हाना मराठी माणसाला आपल्यावर अन्याय कसा होतोय ही भावना चुंबाळायला फार आवडतं हे लक्षात आलं होतं. सतत कोणी तरी आपल्याविरोधात कटकारस्थानं कसं करतंय आणि आपल्यावर अन्याय कसा होतोय हाच सूर.

**बिगर भाजपशासित राज्यांमधील लोकनियुक्त सरकारे आणि राज्यपालांमधील संघर्ष आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. तेलंगणा, तमिळनाडू, पंजाबपाठोपाठ विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांना राज्यपाल संमती देत नसल्याने केरळ राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांना संमती देण्यासाठी राज्यपालांना निर्देश द्यावे, अशी सर्वच राज्यांची याचिकेत मुख्य मागणी आहे.**

# राज्यपाल आणि विधेयक कालमर्यादा

विधानसभेत मंजूर झालेल्या विधेयकांना राज्यपालांनी संमती दिल्यावर त्याचे कायद्यात रूपांतर होते. राज्यपालांची मान्यतेची मोहोर उठत नाही तोपर्यंत विधिमंडळात एकमताने मंजूर झालेल्या विधेयकाला कायद्याचे रूप येऊ शकत नाही. लोकनियुक्त सरकारच्या दृष्टीने हा मोठा अडसर असून, त्यावर काहीच मार्ग निघू शकलेला नाही. केंद्रात काँग्रेसची सत्ता असतानाही विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांमध्ये लोकनियुक्त सरकार विरुद्ध राज्यपाल वाद व्हायचा. तेव्हा तर दिल्लीच्या इशाऱ्यावरून राज्यपाल थेट राष्ट्रपती राजवटीची शिफारस करायचे. त्यातून बहुमतातील सरकारे बरखास्त करण्यात आल्याचे अनेक प्रकार घडले आहेत. पण एस. आर. बोम्मई विरुद्ध भारत सरकार खटल्यात विधानसभेत बहुमत सिद्ध करण्याचे सर्वोच्च न्यायालयाने बंधनकारक केल्याने राज्यपालांवरही मर्यादा



आल्या. भाजप सरकारच्या काळात विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांमध्ये लोकनियुक्त सरकारची कोंडी करण्याची नवीनच प्रथा पडली. विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांना राज्यपालांकडून लगेचच संमती दिली जात नाही किंवा वर्षानुवर्षे राज्यपाल काहीच निर्णय घेत नाहीत. वास्तविक हा एक प्रकारे मतदारांचा अपमानच. कारण लोकांनी निवडून दिलेल्या सरकारला लोकांच्या आशाआकांक्षांनुसार कायदा करण्याचा अधिकार आहे. विधिमंडळाने घटनेच्या तरतुदीच्या विरोधात किंवा राष्ट्रीय हिताच्या आड येणारा एखादे विधेयक मंजूर केल्यास ते अडविण्याचा राज्यपालांना जरूर अधिकार आहे. पण सत्ताधारी पक्षाच्या हिताला आड येते म्हणून किंवा संबंधित राज्यातील भाजपच्या मंडळींचा विरोध असतो म्हणून एखादे विधेयक अडवून ठेवणे हा चुकीचाच पायंडा पडू लागला आहे. लोकशाहीत कायदा करण्याचा विधिमंडळाला अधिकार असला तरी कायदा अमलात येण्याच्या प्रक्रियेत लोकनियुक्त प्रतिनिधींच्या मताला काहीच अधिकार नसणे हे लोकशाहीचे एक प्रकारे अपयशच मानावे लागेल. विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांना राज्यपालांनी किती कालमर्यादेत संमती द्यावी याबाबत घटनेच्या २०० व्या अनुच्छेदामध्ये काहीच स्पष्टता नाही. विधिमंडळाने विधेयक संमतीसाठी राज्यपालांकडे पाठविल्यावर त्यावर किती काळात निर्णय व्हावा याचीही काहीच तरतूद नाही. राज्यपाल एखादे विधेयक फेरविचारार्थ पुन्हा विधानसभेकडे पाठवू शकतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# एल्विश यादव शिंदेंच्या बंगल्यावर कसा?

## विरोधकांच्या आरोपांवर फडणवीसांनी दिलं स्पष्टीकरण

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रसिद्ध युट्यूबर एल्विश यादव हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा बंगल्यावरील गणेशोत्सवात सहभागी झाला होता. दरम्यान नोएडा पोलिसांनी केलेल्या छापेमारीनंतर सापांची तस्करी, रेव्ह पार्टी आयोजित केल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

महाराष्ट्रातील विरोधकी पक्षतील नेत्यांकडून मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर टीका आणि आरोप केले जात आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी एल्विश यादव मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर कसा? याबद्दल स्पष्टीकरण दिलं आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्र्यांकडे गणेशोत्सव असतो तेव्हा वेगवेगळ्या सेलिब्रीटी येत असतात. त्यावेळी एल्विश यादव कुठलातरी रिॲलिटी शो जिंकला होता. अशा अनेक सेलिब्रीटी येऊन जातात. ज्यावेळी तो येऊन गेला तेव्हा त्याच्यावर कुठला आरोप नव्हता. त्यावेळी तो एक सेलिब्रेटी म्हणून आला असेल, आता त्याच्यावर आरोप आहे असं म्हणून जर हिशोब करायला



लागलो तर महाराष्ट्रातील अनेक पुढाऱ्यांना अडचणी होतील. त्यामुळे काहीही वाटलं की मुख्यमंत्र्यांवर आरोप लावण्याचे धंदे चाललेत. हे वैफल्यग्रस्त धंदे उबाठाचे लोकं करत आहेत असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

उद्धव ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी ड्रग्जच्या मुद्द्यावर केलेल्या आऱोपांना देखील फडणवीसांनी प्रत्युत्तर दिलं आहे. फडणवीस म्हणाले की, ड्रग्जच्या संबंधात गुंतलेल्या लोकांवर जेवढे कडक कायदे आहेत, ते सगळे लावण्यात येतील. आपण ड्रग्ज फ्री महाराष्ट्र अभियान सुरू केलं आहे. प्रत्येक जिल्ह्यात छापे टाकले जात आहेत, अशी माहिती देवेद्र फडणवीस यांनी दिलं आहे. जे पोलिस यामध्ये गुंतलेले असतील त्यांना फक्त सस्पेंड नाही तर ३११ प्रामाणे त्यांना डिसमीस केलं जाईल, असेही फडणवीस यांनी सांगितले. कुठल्याही पुराव्याशिवाय केलेले आरोप हे त्यांना काही अर्थ नसतो. अनेक वेळा ते घुमून फिरून आपल्याकडेच येतात. त्यामुळे राजकीय नेत्यांनी असे आरोप करु नयेत असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांवर आरोप लावण्याचे धंदे

» मुख्यमंत्र्यांकडे गणेशोत्सव असतो तेव्हा वेगवेगळ्या सेलिब्रीटी येत असतात. त्यावेळी एल्विश यादव कुठलातरी रिॲलिटी शो जिंकला होता. अशा अनेक सेलिब्रीटी येऊन जातात. ज्यावेळी तो येऊन गेला तेव्हा त्याच्यावर कुठला आरोप नव्हता. त्यावेळी तो एक सेलिब्रेटी म्हणून आला असेल, आता त्याच्यावर आरोप आहे असं म्हणून जर हिशोब करायला लागलो तर महाराष्ट्रातील अनेक पुढाऱ्यांना अडचणी होतील. त्यामुळे काहीही वाटलं की मुख्यमंत्र्यांवर आरोप लावण्याचे धंदे चाललेत. हे वैफल्यग्रस्त धंदे उबाठाचे लोकं करत आहेत असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# लोकसभेला ४५ जागा जिंकणार!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**विरोधक ऊठसूट टीका करत असले तरी येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत आम्ही केलेलं काम तसेच गेल्या नऊ वर्षात मोदी साहेबांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने केलेले काम समाजोपयोगी राबवलेले योजना याचे मोजमाप जनता निश्चित करेल. आरोप करणाऱ्या विरोधकांना त्याचं सडेतोड उत्तर मिळेल. राज्यात शिंदे गट शिवसेना, अजित पवार गट राष्ट्रवादी आणि भाजप यांना राज्यात ४५ जागा मिळतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.**



### आवश्यक निधी देण्यात येईल

» एक टन उसापासून ८०लिटर तर बांबू पासून ४०० लीटर इथेनॉल निघते. एका वर्षात ३२० किलो ऑक्सिजन हवेत सोडत असतो.जाते. कंदाटी खोऱ्यातील तरुणांना रोजगार मिळावा व कृषि अर्थव्यवस्थेला बळ देण्यासाठी बांबू पासून इथेनॉल निर्मिती व बांबू पासून उत्पादन उद्योग उभारण्यात येणार आहे. शहरी भागातील वाढते प्रदूषण टाळण्यासाठी शहरांमध्ये बांबू पार्क उभारण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी आदर्श प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याबाबत माहिती दिली आहे. यासाठी शासनस्तरावरून आवश्यक निधी देण्यात येईल.

विरोधकांना काही कामधंदा राहिला आहे का? असा सवाल करून आम्ही काम करतो. केवळ आरोप करणे हेच काम विरोधकांना असून त्यांच्या आरोपांना कामातून आम्ही उत्तर देत आहोत. त्यांनी बंद ठेवलेले प्रकल्प आम्ही सुरू करतोय. आम्ही कामच करतोय, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. त्यांनी प्रकल्प बंद ठेवले असे अहंकारी वृत्तीचे राज्यकर्ते नसतात आणि असं करून चालतही नाही. त्यामुळे त्यांच्या बोलण्याकडे आम्ही लक्ष देत नाही. आम्ही आमचं काम करत राहतो. रोज सकाळी उठलं की विरोधकांना टीका करणे एवढेच काम शिल्लक राहिलं असल्याची संजय राऊत यांचे नाव न घेता टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या महाबळेश्वर तालुक्यातील दरे या गावी पत्रकारांशी बोलताना केली. आरक्षणाबाबत आम्ही सर्वपक्षीय बैठक घेतली होती. मराठा समाजाने शासनाच्या आश्वासानंतर उपोषण मागे घेऊन आमच्यावर विश्वास ठेवला त्याबद्दल मनोज जरांगे पाटील आणि मराठा समाज यांना मी धन्यवाद दिले आहेत. कायद्याच्या चौकटीत बसणार आणि कायम टिकणार आरक्षण देण्यासाठी आम्ही दिवस-रात्र काम करणार आहोत. कुठल्याही इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता तसेच अन्याय न करता मराठा समाजाला आरक्षण दिलं जाईल, असंही मुख्यमंत्री शिंदे यांनी पत्रकारांच्या प्रश्नावर उत्तर देताना सांगितले. पर्यटन वाढीसाठी कोयना जलाशयामध्ये जल पर्यटनास परवानगी देण्यात आली आहे. त्याअंतर्गत मुनावळे,( ता. जावली )येथे ४५ कोटी रुपये खर्चून प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यामध्ये स्कुबा डायव्हिंग, प्यॅरा ग्लायडिंग, स्पीड बोट, साहसी जल क्रीडा उभारण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. दरे (ता महाबळेश्वर) येथे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्याहस्ते बांबू लागवड करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. प्रसंगी या कृषी मूल्य समितीचे अध्यक्ष पाशा पटेल, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्यासह प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

# दुष्काळी तालुक्यांच्या यादीवर प्रश्नचिन्ह!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

अपुऱ्या पावसामुळे नगर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करण्यासाठी सर्व निकषात बसत असतानाही सबंधित कंपनीच्या चुकीच्या सर्वेक्षणामुळे जिल्हा दुष्काळी उपाययोजनांपासून वंचित राहिला असल्याचा आरोप आमदार निलेश लंके यांनी केला आहे. नगर जिल्ह्यातील एकाही तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला नसल्याने निलेश लंके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून वस्तुस्थितीकडे लक्ष वेधले आहे. निलेश लंके यांनी निवेदनात नमूद केले आहे की, नगर जिल्हयाच्या विशेषतः दक्षिण भागात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस झाला असून पारनेर तालुक्यात महसूल विभागाच्या आकडेवारीनुसार ११३.२३ मि मि पावसाची नोंद झालेली आहे. अकोले १०२.६१, जामखेड ८९.८, कर्जत ८५.३४, नगर १०९.८३, पाथर्डी १०२.३१, राहुरी ६३.३३, शेवगांव ९८.६४ तर श्रीगोंदे तालुक्यात ११०.४२ मि मि पाऊस झालेला आहे. नगर दक्षिणेचा बहुतांश भाग हा दुष्काळी असून पावसाचे सर्वेक्षण करणाऱ्या खासगी कंपनीने प्रत्यक्ष पाहणी न करताच अहवाल सादर केल्याने जिल्ह्यावर अन्याय झाला आहे. दक्षिणेतील सर्व बंधारे, पाझर तलाव, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे कोरडे असून पारनेर तालुक्यातील मांडओहळ, काळू, भांडगाव या प्रकल्पातही पाणी नसल्याचे लंके यांचे म्हणणे आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांच्या खरिपाबरोबर रब्बीच्याही पेरण्याही झाल्या नसून थोडयाफार पावसावर ज्या शेतक-यांनी पेरण्या केल्या त्यांची खते, बियाणे वाया गेली आहेत. टंचाई आराखडयात पारनेर तालुक्यातील ७० गावांचा समावेश असताना दुसरीकडे दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये पारनेरचा समावेश नाही हा विरोधाभास असल्याचे लंके यांनी निदर्शनास आणून दिले. अनेक गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागेल अशी आजची परिस्थिती आहे. ज्यावेळी टॉकर सुरू होतील, त्यावेळी टँकर भरायचे कुठून हा प्रश्न निर्माण होणार असल्याचे म्हटले आहे. केंद्र शासनाने प्रकाशित केलेल्या दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार दुष्काळाचे मूल्यांकन करण्याची कार्यवाही जिल्हास्तरीय देखरेख समितीने करावी असे सुचित करण्यात आले.

# छत्तीसगडची निर्मिती भाजपानं केली


## भ्रष्टाचारातून तिजोरी भरण्याला काँग्रेसचं प्राधान्य : मोदी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**छत्तीसगडमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यात ७ नोव्हेंबरला मतदान होत आहे. त्यापार्श्वभूमीवर भाजपा आणि काँग्रेसमध्ये आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी, ४ नोव्हेंबरला दुर्ग येथील सभेला संबोधित केलं. यावेळी पंतप्रधानांनी बघेल सरकावर टीकास्त्र डागलं आहे. भ्रष्टाचाराच्या पैशातून तिजोरी भरणं हे काँग्रेसचं काम आहे, अशी टीका मोदींनी केली आहे.**

पंतप्रधान मोदी म्हणाले, "छत्तीसगडची निर्मिती भाजपानं केली आहे. भाजपाच छत्तीसगडचा विकास करेल. पण, भ्रष्टाचारातून तिजोरी भरण्याला काँग्रेसचं प्राधान्य आहे. काँग्रेसचे सरकार तुम्हाला लुटण्याची एकही संधी सोडत नाही. यांनी 'महादेव' नावंही सोडलं नाही. दोन दिवसांपूर्वी रायपूरमध्ये पैशांचा मोठा साठा आढळला आहे. हे पैसे जुगार खेळणारे आणि सट्टेबाजांचे असल्याचं लोक म्हणतात. "या पैशांतून काँग्रेसचे नेते आपलं घर भरत आहेत. दुबईत बसलेल्या लोकांशी यांचा काय संबंध आहे? याचं उत्तर मुख्यमंत्र्यांनी छत्तीसगडच्या जनतेला द्यावं. काँग्रेस मोदींना रात्रंदिवस शिव्या घालतात. आता छत्तीसगडच्या मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय तपास यंत्रणांनाही शिव्या देण्यास सुरूवात केली आहे. पण, मोदी शिव्यांना घाबरत नाही. भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी जनतेनं मला दिल्लीला पाठवलं आहे," असं पंतप्रधान मोदींनी सांगितलं. "छत्तीसगड लुटणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. त्यांच्याकडून प्रत्येक पैशांचा हिशोब जाणार आहे. छत्तीसगडच्या भ्रष्ट सरकारनं एकामागून एक घोटाळे केले आहेत. राज्यात पुन्हा भाजपाचं सरकार आल्यानंतर



घोटाळेबाजांची चौकशी करून तुरूंगात पाठवणार," असा इशारा पंतप्रधानांनी दिला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाला काही दिवस उरले आहेत. अशातच 'महादेव' या ऑनलाइन बेटिंग ॲपच्या प्रवर्तकांनी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांना आतापर्यंत ५०८ कोटी रुपये दिल्याचा दावा सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शुक्रवारी केला. तसेच हे प्रकरण चौकशीच्या कक्षेत येत असल्याचे सांगितले. यावरूनच पंतप्रधान मोदींनी काँग्रेस आणि मुख्यमंत्री बघेल यांना लक्ष्य केलं. दिवाळीचा सण काही दिवसांवर आला आहे. त्यापूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील करोडो गरीब जनतेला मोठं दिवाळी गिफ्ट दिलं आहे. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत मोफत रेशन योजनेचा कालावधी पुढील पाच वर्षासाठी वाढवण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. त्यामुळं आता देशातील 80 कोटी लोकांना पुढील पाच वर्ष मोफत रेशन मिळणार आहे. कोरोना महामारीनंतर केंद्र सरकारनं पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना सुरू केली होती. कोरोना महामारीनंतर लॉकडाऊनसह अनेक कडक निर्बंध लादण्यात आले होते. त्यामुळं जनजीवन विस्कळीत झालं होतं. विशेषत: गरिबांना खाण्यापिण्याच्या संकटाचा सामना करावा लागला. अशा परिस्थितीत पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारनं गरीब लोकांच्या मदतीसाठी मोफत रेशन योजना सुरु केली होती. 80 कोटी देशवासी या योजनेचा लाभ घेत असल्याचे सांगण्यात येत आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना पाच किलो गहू किंवा तांदूळ मिळतो. लाभार्थ्यांना हे धान्य मोफत मिळते. केंद्र सरकारने सर्वप्रथम 30 जून 2020 रोजी याची सुरुवात केली होती.

### गरीब लोकांना सरकारकडून रेशन

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी देशातील करोडो गरीब जनतेला दिवाळी भेट दिली. केंद्र सरकारच्या मोफत रेशन योजनेची प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेच्या कालावधीत 5 वर्षाची वाढ केली आहे. या योजनेंतर्गत देशातील कोट्यवधी गरीब लोकांना सरकारकडून रेशन दिले जाते. दिवाळीचा सण आठवडाभरावर असताना या योजनेच्या विस्ताराची घोषणा करण्यात आली आहे. यामुळं देशातील गरीब जनतेला दिलासा मिळाला आहे. छत्तीसगडमधील दुर्ग येथे पंतप्रधान एका जाहीर सभेला संबोधित करत होते. यावेळी त्यांनी मोफत रेशन योजनेला पाच वर्षे मुदतवाढ देण्याची घोषणा केली. या महिन्यात छत्तीसगडमध्ये निवडणुका होणार आहेत. 90 जागांच्या छत्तीसगड विधानसभेसाठी 7 नोव्हेंबर आणि 17 नोव्हेंबरला दोन टप्प्यात मतदान होणार आहे. अशा परिस्थितीत पीएम मोदींच्या या घोषणेला निवडणुकीशीही जोडले जात आहे.


# भाजप पक्षाची ईडीसोबत युती!

## बघेल हे देशातील एक लोकप्रिय मुख्यमंत्री

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भाजपची ईडीसोबत युती आहे. जसजशा निवडणुका जवळ येत आहेत, ही युती आणखी घट्ट होत आहे. कारण भाजप पराभवाकडे वेगाने वाटचाल करत आहे. भूपेश बघेल हे देशातील एक लोकप्रिय मुख्यमंत्री आहेत. महादेव ॲपच्या मुद्द्यावर राज्याच्या बाहेर जाऊन चौकशी करणारे छत्तीसगड हे पहिले राज्य आहे. छत्तीसगडसह, मध्य प्रदेश, ओडिशा, दिल्ली या राज्यांमध्ये छत्तीसगड सरकारने कारवाई केली आहे,.**



असा दावा काँग्रेस मुख्यालयात घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत संघटना सरचिटणीस, के. सी. वेणुगोपाल, वरिष्ठ नेते आणि विधिज्ज्ञ अभिषेक मनू सिंघवी, सरचिटणीस जयराम रमेश यांनी केला. छत्तीसगड सरकारने केलेल्या कारवाईबद्दल अधिक माहिती देताना काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि विधिज्ज्ञ अभिषेक मनू सिंघवी म्हणाले, छत्तीसगड पोलिसांनी ४५० पेक्षा अधिक लोकांना अटक केली. त्यात १९१ लॅपटॉप, ८६५ मोबाईल अशे दीड कोटींहून अधिक रुपयांचे साहित्य, ४१ लाख रोख रक्कम जप्त करण्यात आली. या संदर्भातील पहिला खटला मार्च २०२२ मध्ये दाखल झाला. तसेच या प्रकरणात नाव आलेले आणि दुबईमधून या ॲपचा कारभार बघणारे रवी उप्पल, सौरभ चंद्रहार यांना अटक करण्याची मागणीही भूपेश बघेल यांनी केली आहे, असे काँग्रेस सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले. छत्तीसगडमधून या ॲपची कसलीही हालचाल नाही, असेही पोलीस तपासात निष्पन्न झाले. मात्र याच प्रकरणावर ईडी दीड वर्षांनी कारवाई करते जेव्हा निवडणुकीला चार दिवस बाकी आहेत. प्रत्येक काँग्रेस नेत्याच्या घरासमोर ईडी उभी आहे. अटकेत असलेले एखादे पोलीस अधिकारी मुख्यमंत्र्यांविरुद्ध आरोप करतात, तेही निवडणुकीच्या काळात हे कसे शक्य आहे? यापुर्वी असे कधी झाले होते का? अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती काँग्रेसचे संघटना सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी केली. पुढे बोलताना के. सी. वेणुगोपाल म्हणाले की, राजस्थानमध्ये मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांचे पुत्र, प्रदेशाध्यक्ष गोविंदसिंह डोटासरा यांच्या घरी छापे टाकले गेले. तिथे काही मिळाले नाही याउलट केंद्र सरकारच्या अखत्यारित येत असलेल्या अधिकाऱ्याला लाच घेताना पकडले गेले. जेव्हा निवडणुका येतात तेव्हा ईडी आणि आयकर विभाग भाजपची शस्त्रे बनतात, कर्नाटक निवडणुकीत १०० पेक्षा जास्त उमेदवारांवर छापे टाकण्यात आले.

# केंद्रातर्फे आता २५ रुपये किलोने कांदा!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

ऐन निवडणूक हंगामात कांद्याचे दर कडाडल्याने हा राजकीय मुद्दा बनू नये यासाठी केंद्र सरकारने एनसीसीएफ, नाफेड, केंद्रीय भांडार तसेच राज्य सहकारी संस्थांच्या माध्यमातून २५ रुपये किलो दराने कांदाविक्रीला सुरवात केली आहे. यासाठी राष्ट्रीय राजधानी दिल्लीसह २१ राज्यांमध्ये साडेसातशेहून अधिक विक्री केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. दिल्लीमध्ये केंद्रीय भंडार, मदर डेअरी, सफल या संस्थांच्या विक्रीकेंद्रांवर ग्राहकांना कांदा खरेदी करता येणार आहे. कांद्याचे दर आटोक्यात ठेवण्यासाठी सरकारने अलिकडेच निर्यातीवर ८०० डॉलर प्रतिटन निर्यात शुल्क आकारण्याची घोषणा केली होती. त्यानंतर आता किरकोळ बाजारात ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत कांदा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न आरंभले आहेत. त्यासाठी नाफेडने २१ राज्यांमधील ५५ शहरांमध्ये दुकाने आणि मोबाईल व्हॅन यांचा समावेश असलेली ३२९ किरकोळ विक्री केंद्रे उभारली आहेत. तर राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघाने (एनसीसीएफ) २० राज्याच्या ५४ शहरांमध्ये ४५७ किरकोळ विक्री केंद्रे स्थापन केली आहेत. त्याच धर्तीवर, दिल्लीमध्ये देखील केंद्रीय भांडारच्या विक्री केंद्रांमध्ये कांद्याची किरकोळ विक्री सुरु केली आहे. तर सफल आणि मदर डेअरी तर्फे कांदा विक्री केंद्रे सुरू केली जाणार आहेत. खरीपाचा कांदा बाजारात येण्यास उशीर होत असल्याने कांद्याचे दर वाढले असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. त्यामुळे राखीव साठ्यातील कांद्याची २५ रुपये किलो या अनुदानित दराने विक्री सुरू केली आहे.

# इंद्रधनू उधळतो रंग



'बाजिंद' (BAJIND) या चित्रपटातील रोमँटिक शीर्षक गीत प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. या गाण्याला संगीतप्रेमींची पसंती मिळत आहे. 8 डिसेंबर रोजी 'बाजिंद' संपूर्ण महाराष्ट्रात रिलीज होणार आहे. शान फिल्म्स क्रिएशनची प्रस्तुती असलेल्या 'बाजिंद' चित्रपटाची निर्मिती नंदकुमार शिंदे-सरकार आणि शहाजी पाटील यांनी केली आहे. निर्माते शिंदे-सरकार यांच्या लेखणीतून या चित्रपटाची कथा अवतरली असून, पटकथा, संवाद आणि गीतलेखनासोबतच शहाजी पाटील यांनी दिग्दर्शनाची जबाबदारीही सांभाळली आहे. राष्ट्रीय पारितोषिक विजेता अभिनेता हंसराज जगताप या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहे. त्याच्या जोडीला पूजा बिरारी ही अभिनेत्री आहे. हंसराज आणि पूजा या नव्या कोऱ्या जोडीची ऑनस्क्रीन केमिस्ट्री रसिकांचं लक्ष वेधून घेणारी आहे. 'हातामध्ये हात तुझा, शहारलं अंग, इंद्रधनू नभामध्ये उधळतो रंग...' अशी सुरेख शब्दरचना असलेलं या शीर्षक गीतात गावातील प्रेमी युगुलाच्या प्रेमाचे गुलाबी रंग पाहायला मिळतात. गावाकडच्या साध्याभोळ्या प्रेमाची झलक हेच या गाण्याचं सर्वात मोठं वैशिष्ट्य आहे. नंदकुमार शिंदे-सरकार यांनी हे गाणं लिहिलं असून, प्राजक्ता शुक्रे यांच्या आवाजात संगीतकार ॲग्नल रोमन यांनी संगीतबद्ध केलं आहे. साँग पाहण्यासाठी शान फिल्म क्रिएशनच्या यूट्यूब पेजला सबस्क्राईब, लाईक, शेअर करा. अल्लड वयातील प्रेमाचा सारीपाट मांडणाऱ्या कथानकाला साजेसं असं टायटल साँग रसिकांच्या पसंतीस पडत आहे. या गाण्याबाबत दिग्दर्शक शहाजी पाटील म्हणाले की, कथानकाच्या गरजेनुसार 'बाजिंद' हे टायटल साँग चित्रपटात घेण्यात आलं आहे. गाणं अगदी साध्या पद्धतीनेच चित्रीत करायचं होतं. त्यानुसार ते बनवण्यात आलं असल्याने संगीतप्रेमींना आवडत आहे. हंसराज आणि पूजा यांची सुरेख केमिस्ट्री हे या गाण्याचं आणखी एक वैशिष्ट्य आहे. प्रेमाचे विविध रंग उधळणारं हे गाणं अबालवृद्धांना भावणारं असल्याचंही पाटील म्हणाले. 'बाजिंद' चित्रपटात हंसराज आणि पूजा यांच्या जोडीला शर्वणी पिल्लई, सिद्धेश्वर झाडबुके, अनिल नगरकर, माधुरी पवार, उषा नाईक, प्रेमा किरण, ओंकार भोसले, प्रियंका राठोड आदी कलाकारांच्याही या चित्रपटात भूमिका आहेत. डिओपी इम्तियाज बारगीर यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, संकलन निखिल गांधी यांनी केलं आहे. संगीतकार ॲग्नल रोमन यांनी पार्श्वसंगीत देण्यासोबतच निर्मिती व्यवस्थापकाची जबाबदारी सांभाळली असून, आलोक गायकवाड आणि चंद्रकांत निकम प्रमुख सहाय्यक दिग्दर्शक

# सनी लियोनी चाप अन् चिकन संजू बाबा



बॉलिवूडमधील सेलिब्रिटींच्या चाहता वर्ग मोठा आहे. अनेक चाहते हे बॉलिवूड कलाकारांच्या नावाचा टॅटू काढतात. पण काही हॉटेल्समधील चविष्ट पदार्थांना बॉलिवूड कलाकारांची नावं देण्यात आली आहे (FOOD ITEMS NAMED AFTER CELEBRITIES). एका रेस्टॉरंटमध्ये चिकनच्या डिशला संजय दत्तचं (SANJAY DUTT) नाव देण्यात आलं आहे तर एका हॉटेलमधील चापला अभिनेत्री सनी लिओनीचं (SUNNY LEONE) नाव देण्यात आलं आहे. चिकन संजू बाबा या नावाची डिश ही मुंबई येथील मोहम्मद अली रोड या परिसरातील नूर मोहम्मदी हॉटेलमध्ये मिळते. 2010 पासून मसालेदार ग्रेव्हीसह मिळाणारी ही चिकन संजू बाबा डिश खवय्यांसाठी उपलब्ध आहे. चिकन संजू बाबा डिश या पदार्थांने अनेकांचे लक्ष वेधले आहे. दिल्लीमधील मालवीय नगरमधील एका रेस्टॉरंटमध्ये सनी लियोनी मलाई चाप ही डिश मिळते. या हॉटेलमध्ये 50 पेक्षा जास्त प्रकारचे चाप खवय्यांसाठी उपलब्ध आहेत. यामधील एका चापला अभिनेत्री सनी लियोनीचं नाव देण्यात आलं आहे. दीपिका पदुकोणचा चाहता वर्ग मोठा आहे. ऑस्टिन, टेक्सास येथील डोसा लॅबमध्ये एका डोसाचे नाव दीपिका पदुकोणच्या नावावर ठेवण्यात आले आहे. दीपिका पदुकोणनेही डोसाचे नाव तिच्या नावावर असल्याचे कळताच याबाबत ट्वीट देखील केले होते. तसेच रणवीर सिंहनं देखील मेन्यू कार्डचा एक फोटो शेअर केला होता, ज्यामध्ये 'दीपिका पदुकोण डोसा' असं लिहिलेलं दिसले.

# मुंबईतील प्रदूषणाबाबत केतकीची पोस्ट!

गायिका आणि अभिनेत्री केतकी माटेगावकर ही गेल्या काही दिवसांपासून तिच्या अंकुश या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात तिनं रावी ही भूमिका साकारली. केतकी ही सोशल मीडियावर तिच्या चित्रपटांची माहिती देत असते. तसेच केतकी ही विविध विषयांवर आधारित असणाऱ्या पोस्ट देखील शेअर करते. केतकीनं नुकतीच मुंबईमधील प्रदूषणाबाबत (MUMBAI POLLUTION) एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टच्या माध्यमातून केतकीनं महापालिकेकडे प्रदूषणाबाबत गांभीर्याने विचार करावा, अशी विनंती केली आहे. केतकीनं इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिलं, "#मुंबई, ही गोष्ट गांभीर्याने विचारात घेण्याची गरज आहे, प्रदूषणात वाढ होत आहे! सर्वत्र लोकांना श्वासोच्छवासाचा त्रास, धुळीची ॲलर्जी आणि व्हायरल इन्फेक्शनचा त्रास होत आहे. सुरू असलेली बांधकामे आणि इमारतींची कामे याकडे लक्ष देऊन खबरदारी घेणे आवश्यक आहे! जलस्त्रोतांजवळ कोणताही कचरा फेकण्याआधी विचार करावा. याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची विनंती मी एक जागृत नागरिक म्हणून करत आहे." या पोस्टमध्ये केतकीनं बीएमसीला टॅग केलं आहे. केतकीच्या या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. केतकीचा अंकुश हा चित्रपट 6 ऑक्टोबर रोजी रिलीज झाला होता. शाळा,टाईमपास, काकस्पर्श, फुंतरू, टाईमपास-2 या चित्रपटांमध्ये देखील केतकीनं काम केलं. आता अंकुश या चित्रपटानंतर केतकीच्या आगामी चित्रपटांची देखील प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. केतकी ही गायिका देखील आहे. 'सा रे ग म प लिटिल चॅम्प्स' या स्पर्धेत सहभाग घेतला होता. मला वेड लागले प्रेमाचे,कसा जीव गुंतला,ओली ती माती, सुन्या सुन्या ही गाणी केतकीनं गायली आहेत.

# माझ्या हृदयाच्या खूप जवळ असणारा सिनेमा

अभिनेत्री रिंकू राजगुरू (RINKU RAJGURU) ही सध्या तिच्या 'झिम्मा 2' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. 'झिम्मा-2' हा चित्रपट 24 नोव्हेंबर रोजी रिलीज होणार आहे. रिंकूच्या या आगामी चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. झिम्मा-2 या चित्रपटानंतर रिंकू ही आणखी एका चित्रपटामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटामधील लूकचा फोटो शेअर करुन रिंकूनं या चित्रपटाचं नाव चाहत्यांना सांगितलं आहे. रिंकू ही आशा या आगामी चित्रपटामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटामधील लूकचा फोटो रिंकूनं सोशल मीडियावर शेअर केला आहे. या फोटोमध्ये रिंकू ही हिरवी साडी,गळ्यात मंगळसूत्र आणि चेहऱ्यावर स्माईल अशा लूकमध्ये दिसत आहे. या फोटोला रिंकूनं कॅप्शन दिलं, "आशा हा चित्रपट माझ्या हृदयाच्या खूप जवळ आहे. आमच्या अतिशय खास प्रोजेक्टचं पूर्ण झाला आहे. लवकरच भेटू!" रिंकूनं शेअर केलेल्या या फोटोनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. रिंकूनं शेअर केलेल्या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. आता रिंकूच्या आशा या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. रिंकूचा झिम्मा-2 हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात रिंकूसोबतच अभिनेत्री सुहास जोशी, निर्मिती सावंत,क्षिती जोग,सुचित्रा बांदेकर,सयाली संजीव आणि शिवानी सुर्वे हे कलाकार देखील प्रमुख भूमिका साकारणार आहेत.'झिम्मा-2' हा चित्रपट 24 नोव्हेंबर रोजी थिएटरमध्ये रिलीज होणार आहे.

# आमिर खानच्या लेकीचं केळवण

अभिनेता आमिर खानची (AAMIR KHAN) लेक आयरा खानचा (IRA KHAN) विविह सोहळा लवकरच पार पडणार आहे.मराठमोळा फिटनेस ट्रेनर नुपूर शिखरेसोबत (NUPUR SHIKHARE) आयरा लग्नगाठ बांधणार आहे. नुकतेच आयराचे केळवण पार पडले आहे. आयरानं केळवणाच्या कार्यक्रमासाठी खास लूक केला होता. तसेच केळवणाच्या कार्यक्रमात आयरानं खास उखाणा देखील घेतला. नकात नथ आणि पिंक कलरची साडी असा खास लूक आयरानं केळवणाच्या कार्यक्रमासाठी केला होता. आयरानं तिच्या केळवणाचे काही फोटो आणि व्हिडीओ देखील सोशल मीडियावर शेअर केले आहे. या फोटोमध्ये आयराचा होणारा पती नुपूर देखील दिसत आहे.



आयरानं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती उखाणा देखील घेताना दिसत आहे. ती म्हणते, "मला मराठी येत नाही पण पॉपोयसाठी मी कधी नाही म्हणत नाही" उखाणा घेतल्यानंतर आयरा ही नुपूरला खास खाऊ घालते. आयरानं शेअर केलेल्या केळवणाच्या कार्यक्रमाच्या फोटोमध्ये अभिनेत्री मिथिला पालकर (MITHILA PALKAR) देखील दिसत आहे. आयरानं शेअर केलेल्या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. एका मुलाखतीमध्ये आमिरनं सांगितलं, आयरा ही 3 जानेवारीला लग्न करत आहे. आयरा खान ही फिटनेस ट्रेनर नुपूर शिखरेसोबत 3 जानेवारीला कोर्ट मॅरेज करणार आहे. त्यानंतर त्यांचा लग्नसोहळा राजस्थानमधील उदयपूर येथे होणार आहे.

# पाकिस्तान सेमी फायनलला जाणार?

## 400 धावा करूनही न्यूझीलंड पावसामुळे पराभूत

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**एकदिवसीय विश्वचषक २०२३ च्या स्पर्धेतील ३५ वा सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड संघात खेळला गेला. बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात पाकिस्तानने डकवर्थ लुईस नियमानुसार न्यूझीलंडचा २१ धावांनी पराभव केला आहे. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने ४०१ धावा केल्या होत्या. यानंतर पावसामुळे पाकिस्तान संघाला ४१ षटकांत ३४२ धावांचे आणि नवे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात पाकिस्तानने २५.३ षटकांत एक विकेट गमावून २०० धावा केल्या. यानंतर खेळ होऊ शकला नाही आणि पाकिस्तान संघ २१ धावांनी विजयी झाला.**



या विजयासह पाकिस्तानला उपांत्य फेरी गाठण्याची आशा कायम आहे. त्याचबरोबर न्यूझीलंडचा मार्ग कठीण झाला आहे. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने निर्धारित ५० षटकांत ६ गडी गमावून ४०१ धावा केल्या. रचिन रवींद्रने १०८ धावांची खेळी केली. तर कर्णधार विल्यमसनने ९५ धावांचे योगदान दिले. फिलिप्सने ४१ धावा केल्या. पाकिस्तानकडून मोहम्मद वसीम ज्युनियरने तीन बळी घेतले. हसन अली, इफ्तिखार अहमद आणि हारिस रौफ यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. पाकिस्तानकडून फखर जमानने ८१ चेंडूत नाबाद १२६ धावा केल्या. त्याचवेळी कर्णधार बाबरने ६३ चेंडूत ६६ धावांची नाबाद खेळी केली. २५.३ षटकांत पाकिस्तानची धावसंख्या १ बाद २०० धावा होती. यानंतर पावसामुळे खेळ होऊ शकला नाही आणि पाकिस्तानने डकवर्थ लुईस नियमानुसार २१ धावांनी विजय मिळवला.

न्यूझीलंडकडून टीम साऊदीने एक विकेट घेतली. पाकिस्तानच्या या विजयाचा दक्षिण आफ्रिका संघाला खूप फायदा झाला आहे. दक्षिण आफ्रिका संघाने उपांत्य फेरी गाठली आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या विजयानंतर पाकिस्तानचा संघ गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आला आहे. पाकिस्तान संघाने स्पर्धेत आतापर्यंत एकूण आठ सामने खेळले आहेत. दरम्यान, चार सामने जिंकले आहेत, तर चार सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्याच्या नावावर आठ गुण आहेत. पाकिस्तान आणि न्यूझीलंडसाठी आपापले शेवटचे सामने कोणत्याही किंमतीत जिंकणे महत्त्वाचे आहे. यानंतर नेट रन रेट लागू होईल. या दोन्ही संघांना अफगाणिस्तानच्या पराभवासाठी प्रार्थनाही करावी लागणार आहे. दुसरीकडे ऑस्ट्रेलियाला अजूनही संधी आहे. कारण इंग्लंडनंतर बांगलादेश आणि अफगाणिस्तानविरुद्ध दोन सामने खेळायचे आहेत. येथील दोन विजयांमुळे ऑस्ट्रेलियाला उपांत्य फेरीचे तिकीटही मिळेल. आता न्यूझीलंड आणि अफगाणिस्तान हरले किंवा त्यांचा नेट रनरेट सुधारला तरच पाकिस्तान पोहोचेल. न्यूझीलंडची अवस्थाही अशीच आहे, त्याला पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या पराभवासाठी प्रार्थन करावी लागेल. न्यूझीलंडने दिलेल्या 402 धावांचा पाठलाग करताना दुसऱ्या षटकात अब्दुल्लाह शफिकी स्वस्तात बाद झाला. यानंतर कर्णधार बाबर आझम आणि फखर जमान दुसऱ्या विकेटसाठी केलेल्या 196 धावांची भागिदारी निर्णायक ठरली. यामध्ये फखऱ जमानने 81 चेंडूत 126 धावांची खेळी केली. तर कर्णधार आझमने 63 चेंडूत 66 धावांची खेळी केली. सामन्यात वरूण राजाने लावलेल्या हजेरीमुळे सामना दोन वेळा थांबवण्यात आला. यामुळे पाकिस्तानसमोर 19.3 षटकात 182 धावांचे लक्ष्य होते. या लक्ष्या पाठलाग करताना वरूण राजाने पुन्हा हजेरी लावल्याने डीएलएसचा वापर करत पंचांनी पाकिस्तानला 21 धावांनी विजयी घोषित केले.

### उपांत्य फेरीचे बदलेले समीकरण

चांगल्या नेट रन रेटच्या जोरावर न्यूझीलंड संघ चौथ्या स्थानावर कायम आहे. आता पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांना पुढील सामने जिंकावेच लागणार आहेत. न्यूझीलंडचा सामना श्रीलंकेविरूद्ध तर पाकिस्तानचा ११ नोव्हेंबर रोजी इंग्लंड विरूद्ध सामना होणार आहे. या सामन्यांच्या निकालाकडे दोन्ही संघांचे लक्ष असणार आहे. भारतीय संघाने आतापर्यंत सर्व सात सामने जिंकत मोठ्या दिमाखात उपांत्य फेरीत धडक मारली आहे. या स्पर्धेत लक्षवेधी कामगिरी करणाऱ्या दक्षिण आफ्रिका संघाने सातपैकी सहा सामने जिंकत आपले सेमीफायनलेचे तिकिट पक्के केले आहे.

# टीम इंडियाला मोठा धक्का!

## हार्दिक पंड्या संपूर्ण वर्ल्ड कपमधून बाहेर

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**2023 च्या विश्वचषक स्पर्धेत टीम इंडियाला (TEAM INDIA) मोठा धक्का बसला आहे. स्टार ऑलराउंडर खेळाडू हार्दिक पांड्या वर्ल्डकपमधून बाहेर पडला आहे. विश्वचषकात बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात त्याला दुखापत झाली होती. त्या सामन्यातही पांड्यानं केवळ तीनच चेंडू टाकले होते.**




### इंडिया पॉईंट टेबलमध्ये अव्वल

श्रीलंकेचा तब्बल 302 धावांनी धुव्वा उडवल्यानंतर टीम इंडियानं सेमीफायनल्समध्ये दणक्यात प्रवेश केला. सध्या टीम इंडिया पॉईंट टेबलमध्ये अव्वल स्थानावर आहे. आतापर्यंत टीम इंडियानं 7 सामने खेळले आहेत आणि सर्वच्यासर्व सामने जिंकले आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, भारतीय क्रिकेट संघ उपांत्य फेरीत पोहोचला आहे. मात्र उपांत्य फेरीपूर्वी पांड्याचं संघाबाहेर पडणं खूपच धक्कादायक आहे.

यानंतर टीम इंडियानं मागील तीन सामने त्याच्याशिवाय खेळले आहेत. हार्दिकच्या घोट्याला दुखापत झाली होती आणि तो पुनर्वसनासाठी बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत होता. तेव्हापासूनच चाहते हार्दिकच्या पुनरागमनाकडे डोळे लावून बसले होते. मात्र, आता चाहत्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरलं आहे. ऑलराउंडर हार्दिक पांड्या विश्वचषकातील उर्वरित सामने खेळणार नाही. भारतीय क्रिकेट संघाचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या विश्वचषक 2023 मधून बाहेर पडला आहे. दुखापतीमुळे तो टीम इंडियाच्या प्लेईंग इलेव्हनमधून बाहेर होता. पांड्याच्या जागी प्रसिद्ध कृष्णाचा (PRASIDH KRISHNA) संघात समावेश करण्यात आला आहे. टीम इंडियानं सेमीफायनल्समध्ये दणक्यात प्रवेश केला आहे. यामध्ये ऑलराउंडर पांड्याचा सिंहाचा वाटा आहे. अशातच दुखापतीमुळे संघातून बाहेर गेलेला पांड्या सेमीफायनलपर्यंत संघात पुनरागमन करेल, अशी अपेक्षा होती. मात्र, दुखापतीमुळे हार्दिक पांड्या विश्वचषकाचे उर्वरित सामने खेळणार नसल्याची माहिती मिळत आहे. पांड्या उपांत्य फेरीतून बाहेर पडणं हा टीम इंडियासाठी मोठा धक्का आहे. अनुभवी अष्टपैलू असलेला हार्दिक पांड्या टीम इंडियासाठी किती महत्त्वाचा आहे.

# पैलवानांनो तयारीला लागा!

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

राज्यातील पैलवानांनासाठी आनंदाची बातमी आहे. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार यंदा पुणे जिल्ह्यील फुगावमध्ये रंगणार आहे. या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा 7 ते 10 नोव्हेंबर दरम्यान रंगणार आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या विजेत्याला महिंद्रा थारजीप, ट्रॅक्टर आणि रोख बक्षीस मिळणार आहे.

7 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 5 वाजता स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष खासदार रामदास तडस आणि उपाध्यक्ष मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते होईल. तर स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेमध्ये साधारण 50 हजार प्रेक्षक क्षमता असलेले स्टेडियम उभारण्यात आलं आहे. शाळेचे संस्थापक दीपक पायगुडे यांनी स्टेडियमच्या व्यवस्थितसाठी सहकार्य केले आहे. या स्पर्धेत 36 जिल्हा आणि 6 महानगरपालिका असे एकूण 42 संघ सहभागी होत आहेत. एका कुस्ती संघात गादी विभागातील 10 आणि माती विभागातील 10 असे एकूण 20 कुस्तीगीर 2 कुस्ती मार्गदर्शक आणि 1 संघ व्यवस्थापक असे एकूण 23 जणांचा सहभाग असेल. साधारण या कुस्ती स्पर्धेत 840 कुस्तीगीर 84 कुस्ती मार्गदर्शक आणि 42 व्यवस्थापक, 80 पंच आणि 50 पदाधिकारी असे एकूण 1100 जणांचा सहभाग असेल. कुस्तीगीरांचे आगमन, वैद्यकीय तपासणी आणि वजने दिनांक 6 नोव्हेंबर रोजी होणार आहेत. 7